अर्ज क्र. ९०३३९८२०००००२७०
दि. ०५/०८/१८

1150
16/5/19

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

(पत्रव्यवहारात क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.)

(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

स्थापना ११/१०/८२

बीपी/रावेत/७८/१८ (कमेन्समेंट सर्टिफिकेट) दि. १८/०७/१८

सुधारीत

## बांधकाम चालू करणेकरिता दाखला

सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ ची कलम ४५ यातील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ ची कलमे (सेक्शन्स)२५३ व २४५ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटीवर देण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८.
क्रमांक -बी.पी./ रावेत /६२/ २०१८
दिनांक १५ / ०५ / २०१८

श्री./श्रीमती/मे. विजयकुमार गोपीचंद रामचंदानी व इतर २ तर्फे मे. कृष्णा - रेणुका शिमाळीरी तर्फे अजय म्हेत्रे व इतर - २
द्वारा : ला. आ. / ला. स. श्री. प्रितम सरोदे
ऑ.नं. ३०८ रोज आयकॉन विश्वमा बँकेजवळ पि. सौदागर पुणे २७ यांना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे रावेत येथील सर्व्हे नं. ८४पै सिटी सर्व्हे नं. — प्लॉट नं. ............ मधील बांधकाम करण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेला अर्ज दाखल केला तो दिनांक ०५/०४/२०१८ रोजी प्राप्त झाला. यावरुन बांधकाम करण्यास खाली नमूद अटींवर व जादा अट क्र. ...३१...... ते ...३२.....नुसार तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या मंजूर नकाशात दाखविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करणे बंधनकारक आहे.
२) जोत्यापर्यंत काम आल्यानंतर नगररचना व विकास विभागाकडून सेटबॅक तपासून घ्यावेत. त्याशिवाय जोत्यावरील काम सुरु करु नये.
३) सोबतच्या नकाशावर नमूद करण्यात आलेल्या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.
४) ज्या भूखंडावर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे त्या इमारतीच्या भोगवटा दाखला मागण्यापुर्वी विकसकाने इमारतीसमोर कंपाऊंड वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करावी त्या शिवाय भोगवटा दाखला मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरुर ते संरक्षण कुंपण विकसकाने करावयाचे आहे तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.
५) इमारतीचा भोगवटा दाखला देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
६) नवीन बांधकाम सुरु करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती ट्री अॅथॉरिटीची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते, याची नोंद घ्यावी.
७) आपण संबंधित बांधकाम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचा भंग करुन सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता सुरु केल्याबद्दल/तसेच उक्तील मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न करता त्यात बदल व फेरफार करुन या बांधकामाचे सुधारित नकाशास पूर्व परवानगी न घेता बांधकाम केल्याबद्दल इमारतीचे भोगवटा पत्रक न घेता भोगवटा केल्याबद्दल, आपणाविरुध्द नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा म.न.पा. चा हक्क राखून ठेवला आहे.
८) बांधकाम साहित्य अथवा जुन्या बांधकामाचा निघालेला राडारोडा सार्वजनिक रस्त्यावर मनपा चे परवानगी शिवाय ठेवता येणार नाही. जर हे साहित्य सार्वजनिक जागेवर ठेवल्याचे आढळल्यास त्यासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार रु. ३०००/- प्रति दिन याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
९) पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक इत्यादि आवश्यक विभागाचे ना हरकत दाखले इकडे सादर करावेत.
१०) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकाच्या नावे दर्शविलेली टपालपेटी सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील.
११) विकास आराखड्यातील रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.
१२) इमारतीच्या सलोह कॉंक्रिट (आर.सी.सी.) कामाच्या सर्व बाजूंकरिता आधार व आकारासाठी लाकडांचा वापर करु नये त्यासाठी लोखंडी आधारांचा वापर करणे बंधनकारक राहील.

१३) इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स, पुणे-३० या संस्थेकडील मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअर्सची इमारतीच्या कामासाठी नेमणूक करण्यात यावी तसेच सदरचे काम स्वीकारल्याबाबतचे स्ट्रक्चरल इंजिनिअर्स यांचे पत्र या विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे, सदरचे पत्र सादर केल्याशिवाय इमारतीच्या बांधकामास सुरुवात करु नये.

१४) भूखंडाच्या संबंधित सहामाही अद्येरचा कर भरल्याचा करसंकलन विभाग मनपा यांचे कडील दाखला / पावती सादर केल्याशिवाय बांधकाम चालू करू नये.

१५) मंजूर रेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे नियम क्र. ११.३.१.५नुसार तरतुदीचे अधिन विकसित करणे बंधनकारक आहे, त्याशिवाय भाग अथवा संपूर्ण भोगवटा दाखला दिला जाणार नाही.

१६) विकास आराखड्यातील रस्ता बाधित क्षेत्र नियमानुसार महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. रस्ता रुंदीने बाधित क्षेत्र म.न.पा चे नावे लावून ७/१२ चा उतारा/सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा सादर जागेचा FSI/DR अनुज्ञेय करणेपूर्वी या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू रस्तारुंदीने बाधित क्षेत्राचा विकास मनपाच्या विनिर्देशाप्रमाणे विकसक यांनी स्वत: करणे आवश्यक आहे अथवा मनपाच्या त्यावेळेच्या प्रचलित दराने विकास खर्च भरणे आवश्यक आहे.

१७) प्रस्तुत प्रकरणातील जागेचा मोजणी नकाशा वहिवाटीनुसार असून हद्दीबाबत वाद निर्माण झालेस त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही. नगरभूमापन कार्यालयाकडील सुधारित मोजणी नकाशा/ मालमत्ता पत्रक सादर केल्याशिवाय बांधकामास भोगवटा दाखला देण्यात येणार नाही.

१८) प्रस्तुत प्रकरणातील भूखंडाचे एकत्रिकरण नगर भूमापन कार्यालयाकडून घेऊन, त्याप्रमाणे सुधारित मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा भोगवटापत्रक घेण्यापूर्वी या विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

१९) ३०० चौ.मी. वरील क्षेत्राचे भूखंडावरील इमारतीसाठी (दाटवस्ती क्षेत्र वगळून) रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

२०) भूखंडालगतचे पोहोच रस्ता व आसपासचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होणे सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रं.१.१ नुसार योग्य ती उपाययोजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. याबाबत संबंधित गाळेधारक रहिवासी यांची कोणत्याही प्रकारे तक्रार / हरकत निर्माण झाल्यास त्यांचे संपूर्णत: निराकरण करण्याची जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. त्यांची मनपास कोणत्याही प्रकारे नोटीस लागू देता नाही. या अटीवर सदरहू बांधकाम चालू करण्याचे संमतीपत्र मंजूर करण्यात येत आहे..

२१) इमारतीमध्ये पुरविण्यात आलेल्या पार्कींगचे क्षेत्र गाळेधारकांसाठी विनामोबदला उपलब्ध करुन देणे विकसकावर बंधनकारक राहील. याबाबत कोणतीही तक्रार आल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी विकसकाची राहील.

२२) मा. उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचेकडून वर्ग १ साठी जमिनीची बिनशेतीची दाखला तसेच वर्ग २ साठी आवश्यक तो ना हरकत दाखला महानगरपालिकेस सादर केल्याशिवाय बांधकाम परवानगी देणेत येऊ नये.

२३) म्हाडास द्यावयाच्या सदनिका, पुर्णत्वानंतर इमारतीना भाग / संपूर्ण भोगवटा दाखला देण्यात येईल.

२४) यु.एल.सी. बाबत विकसक यांनी सादर केलेले हमीपत्रास अधिन राहून बांधकाम परवानगी देणेत येत आहे.

२५) सर्व बांधकाम व्यवसायिक / विकसक / जागा मालक यांनी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ व कंत्राटी कामगार (नियम आणि निर्मुलन) अधिनियम १९७० अनुषंगाने सर्व कामगारांना आरोग्य सुरक्षितता व त्यांचे कल्याण (Welfare) विषयक कायद्यातील तरतुदींची पुर्तता करुन देणे बंधनकारक आहे.

२६) मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी खनिकर्म शाखा यांचे निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. खनिकर्म/कावि/८७७/२०१६ दि. ३१/०३/२०१६ नुसार विकासकाने बांधकामासाठी लागणारे गौण खनिज हे अधिकृतरित्या जाहिर केलेल्या व परवानगी दिलेल्या दगड, खडी, मुरुम, माती, वाळू, परवानाधारक यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक राहील.

२७) भूखंडातील बांधकामाचे क्षेत्र (Construction area) ५००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यास (Ministry of Environment Forest and Climate Change) यांचे कडील दि. २८ जुन २०१७ च्या नोटीफिकेशननुसार व बांधकाम क्षेत्र २०००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यास दि. २९ जानेवारी २०१८ चे (Circular) नुसार अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. व अशा प्रकरणी पर्यावरण विभागाचा ना हरकत दाखला सादर केल्याशिवाय बांधकामास सुरूवात करू नये.

२८) सदरची परवानगी ही संबंधित विकासकाने रियल इस्टेट रेग्युलेशन अँन्ड डेव्हलपमेंट अॅक्ट २०१६ (RERA) अंतर्गत विहित मुदतीत नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२९) भूखंड क्षेत्र २००० चौमी पेक्षा जास्त किंवा ५० पेक्षा अधिक सदनिका असल्यास WATER RECYCLE UNIT उभारुन कार्यान्वित करणे विकसकावर बंधनकारक राहील.

उप अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत माहितीसाठी :१) सहा. मंडलाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, मनपा / पिंपरी वाघेरे / पिंपरीनगर / चिंचवड/भोसरी / कासारवाडी / आकुर्डी / निगडी प्राधिकरण / सांगवी / पिंपळे गुरव / पिंपळे निलख / पिंपळे सौदागर / वाकड / रावेत / रहाटणी / थेरगाव.

२) करसंकलन विभाग, मुख्य कार्यालय, पिंपरी, पुणे - १८

३) मा. मुख्याधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ, आगरकरनगर, पुणे ४११ ००१. (MAHADA)